आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

८ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- शिक्षण हे सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्र उभारणीचं माध्यम असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- भारतीय रिझर्व बँकेचं चालू आर्थिक वर्षातलं तिसरं द्वैमासिक पतधोरण जाहीर, सलग नवव्यांदा रेपो दर कायम

- लोकसभेत वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक सादर/अल्पसंख्यकांना न्याय मिळणार असल्याचा सरकारचा दावा, तर विरोधी पक्षांचा विधेयकाला विरोध

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भालाफेकपटू नीरज चोप्रा पदकासाठी मैदानात/महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिची निवृत्तीची घोषणा

**<><><><><>**

शिक्षण हे सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्र उभारणीचं माध्यम असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज वेलिंग्टन इथं टाकिना वेलिंग्टन कन्व्हेन्शन सेंटर मध्ये आयोजित ‘न्यूझीलंड आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेला’ संबोधित करत होत्या. देशातल्या शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी भारत सरकारनं अनेक महत्वाची पावलं उचलल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

राष्ट्रपती दोन दिवसांच्या न्यूझीलंडच्या दौऱ्यावर आज सकाळी राजधानी वेलिंग्टन इथं पोहोचल्या. न्यूझीलंडच्या गव्हर्नर जनरल डेम सिंडी किरो यांच्या उपस्थितीत वेलिंग्टन इथल्या शासकीय निवासस्थानी त्यांचं औपचारिक स्वागत करण्यात आलं, आणि त्यांना रॉयल गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वेलिंग्टन रेल्वे स्थानका समोरच्या उद्यानातल्या महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

राष्ट्रपती मुर्मू आज न्यूझीलंडच्या गव्हर्नर जनरल, डेम सिंडी किरो, प्रधानमंत्री क्रिस्टोफर लक्सन परराष्ट्र मंत्री विन्स्टन पीटर्स यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील. त्यानंतर त्या पुकेआहू नॅशनल वॉर मेमोरियल इथं पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहतील आणि गव्हर्नर जनरल यांनी त्यांच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या मेजवानीला उपस्थित राहतील.

<><><><><>

भारतीय रिझर्व बँकेनं आज चालू आर्थिक वर्षातलं तिसरं द्वैमासिक पतधोरण जाहीर करताना सलग नवव्यांदा रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीनं रेपो दर ६ पूर्णांक ५ दशांश टक्क्यावर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे स्थायी ठेवींवरचा व्याज दर ६ पूर्णांक २५ शतांश टक्के राहील, तसंच मुदत ठेवींवरचा व्याज दर आणि बँकांचा व्याज दर ६ पूर्णांक ७५ शतांश टक्क्यावर कायम राहील, असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितलं. आर्थिक विकासाला चालना देताना चलनवाढ निर्धारित उद्दिष्टाशी सुसंगत राहील, यावर लक्ष केंद्रित करण्यावर पतधोरण समितीनं भर दिल्याचं ते म्हणाले.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची ६, ७ आणि ८ ऑगस्ट रोजी बैठक झाली. पुढील बैठक ७ ते ९ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभेत आज वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ सादर होणार आहे. अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू ते सादर करतील. यात वक्फ कायदा १९९५ मध्ये सुधारणा करुन राज्य वक्फ बोर्डांचे अधिकार आणि कार्यप्रणाली तसंच वक्फ मालमत्तेची नोंदणी आणि सर्वेक्षणाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. अल्पसंख्याकांना न्याय देण्यासाठी हा कायदा आणण्यात आल्याचं सरकारनं म्हटलं आहे. काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं या विधेयकाला विरोध केला असून सर्वपक्षीय बैठक बोलावून सूचना घेण्याची मागणी केली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक २०२४ आज लोकसभेत मांडणार आहेत. यात आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मध्ये केलेल्या सुधारणा कामकाजात विचारात घेतल्या जाणार आहेत.

सरकारनं जल जीवन मिशन अंतर्गत देशभरातील ७७ टक्क्यांहून अधिक ग्रामीण कुटुंबांना नळ जोडणी दिली आहे असं लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पूरक प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी सांगितलं. या योजने अतर्गत आतापर्यंत १५ कोटी कुटुंबांना नळ जोडणी दे◌िल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

कांदा आणि बटाट्याच्या दर वाढीवरून विरोधी पक्षांच्या खासदारांनी आज संसदेबाहेर निदर्शनं केली. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी कायदेशीर मार्गानं किमान हमीभाव देण्याची मागणी खासदारांनी केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन, आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह इतर नेते आंदोलनात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

बांगलादेशात आज नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारचा शपथविधी होणार असल्याचं बांगलादेशाचे लष्कर प्रमुख जनरल वकार-उज-जमा यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. हंगामी प्रधानमंत्री मोहम्मद युनुस यांच्यासह १५ मंत्री आज शपथ घेतील. येत्या ३ ते ४ दिवसांत देशातली परिस्थिती नियंत्रणात येईल अशी आशा व्यक्त करत हिंसाचारात सहभागी असणाऱ्या दोषींवर लवकरच कडक कारवाई करण्यात येईल असंही वकार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्था यंदाचा स्वातंत्र्य दिवस पृथ्वी निरीक्षक उपग्रह प्रक्षेपित करून साजरा करणार आहे. १५ ऑगस्ट रोजी श्रीहरीकोटा इथून सकाळी ९ वाजून १७ मिनिटांनी इस्रोनं विकसित केलेला लघु उपग्रह प्रक्षेपकाच्या सहाय्यानं EoS 08 हा पृथ्वी निरीक्षक उपग्रह अवकाशात सोडला जाईल. त्यानंतर तो पृथ्वीच्या कक्षेत स्थिरावेल. हा उपग्रह आपत्ती निरीक्षण, रिमोट सेन्सिंग, आग आणि पूर शोध आणि अतिनील किरण मापनासाठी उपयुक्त असलेल्या प्रगत तंत्रज्ञानानं सुसज्ज आहे.

उपग्रह प्रक्षेपणासाठी वापरला जाणारा लघु प्रक्षेपक कमी खर्चात तयार झाला असून, त्यामध्ये एकाच वेळी अनेक सूक्ष्म उपग्रह सामावून घेण्याची, तसंच किमान पायाभूत सुविधांसह उपग्रह प्रक्षेपित करण्याची क्षमता आहे. हा प्रक्षेपक ५०० किलो वजनाचा उपग्रह पृथ्वीच्या कक्षेत ५०० किलोमीटर अंतरापर्यंत नेऊ शकतो. १५ ऑगस्ट रोजी चाचणी प्रक्षेपण यशस्वी झाल्यावर हा प्रक्षेपक खासगी क्षेत्राकडे उत्पादनासाठी हस्तांतरित केला जाईल असं इस्रोच्या सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रसरकारनं काल राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रांमध्ये अतुलनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या प्रतिष्ठेच्या पुरस्कारानं सन्मानित केलं जातं. यंदा इस्रो-चांद्रयान ३ च्या चमूला अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानामधल्या योगदानाबद्दल ‘विज्ञान टीम’ या पुरस्कारानं सन्मानित केलं जाईल. भारतीय विज्ञान संस्थेचे माजी संचालक प्राध्यापक जी. पद्मनाभन यांची जीवशास्त्रातल्या ‘विज्ञानरत्न’ पुरस्कारासाठी निवड झाली आहे. याशिवाय विज्ञानश्री आणि विज्ञान युवा पुरस्कारही घोषित झाले आहेत.

विज्ञान रत्न पुरस्कार विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या आजीवन कामगिरीला सन्मानित करतो. येत्या २३ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**<><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक मध्ये आजचा दिवस भारतासाठी अत्यंत महत्वाचा असणार आहे. भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्रा आज पुन्हा पदकासाठी मैदानात उतरणार आहे. तर पुरुष हॉकी संघाची कास्य पदकासाठी स्पेन बरोबर लढत होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार नीरज चोप्राचा सामना रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी सुरू होईल. तर पुरुष हॉकी संघाचा सामना संध्याकाळी ५ वाजता होणार आहे. कुस्ती मध्ये अमन सहरावत पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात तर अंशु महिलांच्या ५७ किलो वजनी गटात, फ्री स्टाइल कुस्ती प्रकारात मैदानात उतरणार आहेत.

दरम्यान, भारताची वेटलिफ्टर मिराबाई चानु ४९ किलो वजनी गटात चौथ्या स्थानापर्यंत मजल मारू शकली. तर धावपटू अविनाश साबळे याला पुरुषांच्या ३ हजार मीटर स्टिपलचेज प्रकारात अकराव्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

**<><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरल्यानंतर भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिनं आज आपल्या निवृत्तीची घोषणा केली. समाजमाध्यमावर पोस्ट करत आपण सर्व चाहत्यांच्या आणि देशवासियांच्या कायम ऋणात राहू असं विनेशनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते बुद्धदेव भट्टाचार्य यांचं आज कोलकत्यात निधन झालं. ते ८० वर्षांचे होते.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं देशाच्या पूर्व, पश्चिम, मध्य, वायव्य आणि ईशान्य भागात मेघ गर्जनेसह हलक्या ते मध्यम पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज वर्तवला आहे. पुढल्या ५ दिवसांत देशाच्या दक्षिण भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

ब्रिटन आणि इजिप्तनं आपल्या विमान कंपन्यांना इराण आणि लेबनॉनची हवाई हद्द टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. हमासच्या प्रमुखाची अलीकडेच हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर या भागात तणाव वाढला आहे. अनेक देशांनी इस्त्रायल आणि लेबनॉनला जाणाऱ्या विमानसेवा रद्द केल्या असून इतर उड्डाणांसाठी इराण आणि लेबनॉनची हवाई हद्द वापरू नये, असं सांगितलं आहे.

**//<><><><><>//**